
ॐ

# ॥ स्वरूप-लहरी ॥

✻ श्रीक्षेत्र पावसनिवासी परमपूज्य श्रीस्वामी स्वरूपानंद यांच्या पावन स्मरणाने अंत:करणात उसळलेला प्रेमलहरींचा कल्लोळ ✻



✻ कृष्णदास ✻

स्वरूप-लहरी, सबाह्याभ्यंतरी ।
सर्व विश्वांतरी, व्यापुनिया ।।१।।
पावसी मानसी, अणुरेणुयासी ।
झंकार नित्यासी, सोऽहं सोऽहं ।।२।।
नेक सोऽहं भावे, एकरूप व्हावे ।
स्वरूपी त्या जावे, विश्रांतीसी ।।३।।
ज्ञानियाची भक्ति, ज्ञानियाची युक्ति ।
कृष्णदास चित्ती, ठसलीसे ।।४।।

***

सोऽहं सोऽहं करी, भेटविल हरि ।
स्वरूप-लहरी, स्पर्शितील ।।१।।
विचारांची दूरी, तात्काळचि खरी ।
सोऽहं ते अंतरी, स्मरताचि ।।२।।
तयासीच धरी, मना स्थिर करी ।
अमन ते करी, अंती तुझे ।।३।।
स्वरूपाची न्यारी, चव तेथ खरी ।
स्वरूपचि दावी, तुझे ठायी ।।४।।
ज्ञाता ज्ञान ज्ञेय, स्वरूपचि होय ।
कृष्णदासा सोय, सोऽहं सोऽहं ।।५।।

***

इथे चाले सोऽहं, तिथे चाले सोऽहं ।
सोऽहं सोऽहं सोऽहं, सर्वत्रचि ॥१॥
परी त्याचे ध्यान, विरळाचि जाण ।
गुरुकृपा खूण, लाभे जया ॥२॥
स्वरूप-लहरी, येती वरचेवरी ।
स्पर्शिति त्या जरी, अवधान ना गा ॥३॥
व्हावे सावधान, सोऽहं घेई भान ।
अंतरीचा प्राण, लक्षी नीट ॥४॥
होवोनिया धीट, मना मारी फाट ।
स्वरूप अवीट, सुधा चाखी ॥५॥
अभ्यासाचा प्रांत, निवांत निश्चिन्त ।
क्रमितसे नित, कृष्णदास ॥६॥

***

आसनी गा ताठ, जालंदर नीट ।

खेचा श्वास थेट, सहस्रारी ।।१।।

सोडोनिया द्यावा, सुखे जाऊ द्यावा ।

परी तो लक्षावा, कैसा जाय ।।२।।

भान ऐसें घ्यावे, स्वस्थ ते बैसावे ।

लक्षित्यासी घ्यावे, मनामाजी ।।३।।

घ्यावी 'त्या'ची जाण, तोचि 'तू' गा जाण ।

सांगतसे खूण, कृष्णदास ।।४।।

***

सोऽहंमय देही, स्व-रूपचि पाही ।
स्वरूपाच्या देही, सोऽहं सोऽहं ।।१।।
ध्येय ध्याता ध्यान, सोऽहं सोऽहं जाण ।
उगमाचे स्थान, सोऽहं सोऽहं ।।२।।
होता स्वामी ध्यान, तेचि सोऽहं ध्यान ।
होतसे गा क्षीण, देहबुद्धि ।।३।।
स्वरूप-लहरी, आत्मबुद्धीवरी ।
अलगद स्वारी, बैसविती ।।४।।
स्वामीसंगे वारी, हो वरचेवरी ।
सोऽहं सोऽहं करी, कृष्णदास ।।५।।

***

स्वरूपाची प्रभा, संग होता उगा ।

सोऽहं होय जागा, सहजचि ।।१।।

स्वामी करी सोऽहं, भक्ता ध्यान सोऽहं ।

सोऽहं सोऽहं सोऽहं, गुरूशिष्य ।।२।।

नाद एकत्वाचा, देहादेही साचा ।

खेळ चाले त्याचा, स्वरूप-लहरी ।।३।।

तयांवरी स्वार, स्वामी दरबार ।

होतसे हजर, कृष्णदास ।।४।।

***

स्वामी करी स्मित, पाही भक्त हित ।
जागृत साक्षात्, सोऽहं सोऽहं ।।१।।

स्वरूप-लहरी, पावसच्या पुरी ।
गाठती सत्वरी, भक्तस्थान ।।२।।

तेणे भक्त हृदय, आंदोलित होय ।
सोऽहं घोष होय, हृदयाहृदयी ।।३।।

तेणे निनादत, शब्द हे उठत ।
करी जे लिखित, कृष्णदास ।।४।।

***

जीवाच्या भोवती, आवरणे होती ।
लहरी उठती, भिन्न भिन्न ॥१॥
जीव तोचि शिव, तोचि सोऽहं रव ।
तेथ नाही ठाव, भिन्नत्वासी ॥२॥
स्वरूप-लहरी, व्हावे एकाकारी ।
तोचि साक्षात्कारी, म्हणितला ॥३॥
भेदी आवरणा, जाई केंद्रस्थाना ।
स्वरूपाच्या खुणा, लाभतील ॥४॥
हेचि सांगे स्वामी, युक्ति हीच नामी ।
घेतसे ती ध्यानी, कृष्णदास ॥५॥

***

स्वामीराया संगे, सोऽहं घोषा संगे ।
स्वरूपाच्या रंगे, रंगू चला ।।१।।
रंग आनंदाचा, रंग तो शांतीचा ।
रंग तो तृप्तीचा, लेवू चला ।।२।।
तेचि हो भूषण, अलंकार जाण ।
बाळा लेववून, स्वामी तोषे ।।३।।
ऐसी स्वरूपाई, पावसी ती राही ।
बाळ मनी ध्याई, कृष्णदास ।।४।।

***

नित्य निर्विकार, राही गा तू मना ।।
स्व-स्वरूप ध्याना, सोडू नको ।।१।।
कोरोना कोरोना, नको जप मना ।
स्वामी आशीर्वचना, विसरू नको ।।२।।
भय मनी नाणा, कर्तव्या ना उणा ।
दास श्रेष्ठ जाणा, सद्‌गुरूंचा ।।३।।
कृपेच्या त्या खुणा, दावितसे राणा ।
पावसी शरणा, कृष्णदास ।।४।।

***

स्मृति पावसेची, नित्य आम्हां साची ।
वार्ता विरहाची, न बाधेचि ।।१।।
स्वामी स्मर्तृगामी, क्षणे येतो जातो ।
ठायीच स्मरतो, आम्हीं त्यासी ।।२।।
ध्यानी मनी स्वामी, सोऽहं सोऽहं स्मरणी ।
साधनेची खुणी, हीच असे ।।३।।
विश्वाकार स्वामी, दास आम्ही नामी ।
आनंदा ना कमी, कृष्णदासा ।।४।।

***

ध्यास तो पावस, आस मनी पावस ।
वास व्हावा पावस, नित्य आम्हां ।।१।।

मनी हीच आस, असे गा भक्तांस ।
क्षणेक्षणी मानस, पावस लक्षे ।।२।।

सुमुख सुंदर, स्मित-हास्य मुखावर ।
प्रेमळ स्वामीवर, आम्हां हृदयी ।।३।।

स्वामी कृपाळुवा, लाविलासे लळा ।
कृष्णदास बाळा, सांभाळितो ।।४।।

***

पावसीचे बाळ आम्ही, कापे कळीकाळ ।
गर्जे सदाकाळ, सोऽहं ह्रदयी ।।१।।
नाथपंथी स्वामी माझा, आम्ही हो सनाथ ।
माथ्यावरी कृपाहस्त, जाहलो निश्चिंत ।।२।।
चालतो हळुहळू, निर्गुणाचा पंथ ।
स्वामी सगुणात, लीला करी ।।३।।
अनंतात स्वामी, प्रत्यक्ष अनंत ।
कृपेचा ना लागे अंत, कृष्णदासा ।।४।।

***

कुणी देखियेले, ब्रह्म ते रे सांगा ।
निर्गुणाच्या अंगा, सगुणी गा ।।१।।
निर्गुणाचे गुण, सगुणी आले ।
पावसी देखिले, स्वरूप-ब्रह्म ।।२।।
कोण क्रीडा करू शके, निर्गुणासंगे ।
स्वामीसंगे, आम्ही क्रीडा केली ।।३।।
प्रेमे नाचू गाऊ, सारे आनंदात ।
क्षेत्र पावसेत, कृष्णदास ।।४।।

***

आता कैसे काय, सद्‌गुरुंसी ध्याऊ ।
मना नाही ठावू, उरलासे ।।१।।
मन माझे नेले, सद्‌गुरुने विलया ।
चरणांसी ध्याया, उरले काय ।।२।।
पावसीचा स्वामी, काम करी नामी ।
हृदयीच विश्रामी, कृष्णदास ।।३।।

***

नाच नाच सखया, पावसेच्या अंगणात ।

अनंत अनंतात, बैसलासे ।।१।।

द्वारी राहू तिष्ठत, वाचे नाम गात गात ।

भक्तिने गा डोलत, स्वरूपनाथ ।।२।।

स्वामी रंगे सोऽहं संगे, भक्त रंगे स्वामी संगे

कृष्णदास गात अभंगे, रंगलासे ।।३।।

***

भक्त आले सारे नामी,
पलंगासी हासे स्वामी ।
दिसतसे दिवस नामी,
भक्तिभावे नाचू आम्ही ।।१।।
ॐ राम कृष्ण हरि,
नाम गर्जते वैखरी ।
तोचि हरि पलंगावरी,
कवतुक डोळेभरी ।।२।।
हास्य स्वामी मुखावरी,
मोद भक्तांसी अंतरी ।
कृष्णदास नाचे डोले,
स्वरूपानंद हृद्यंतरी ।।३।।

***

स्वामी कां गां मौनावला,

देहभान विसरला ।

सोऽहं जपता नामावळी,

सोऽहं तो ही अस्तवला ।।१।।

भक्त तिष्ठे दर्शनाला,

करीतसे प्रार्थनेला ।

उगी उगी जागा होई,

देई देई दर्शनाला ।।२।।

जागृत अंतराला,

स्वामी कधी अंतरला ।

कृष्णदासासकट, गिळियेले ब्रह्मांडाला ।।३।।

***

ब्रह्मांडाची काय मात,
स्वामी नित्य हृदयात ।
सोऽहं सोय पिंडात या,
दावुनिया उघडे गाठ ॥१॥
खूण घ्यावी ध्यानी नीट,
मार्ग असे जरी बिकट ।
कृपा स्वामींची अचाट,
लंघू सहजी सर्व घाट ॥२॥
माया करी थयथयाट,
परि कृपेचा त्या काय थाट ।
घेऊनिया सहजी घोट,
कृष्णदास ब्रह्मांडात ॥३॥

***

स्वामी स्वामी गात गात,
चला जाऊ पावसेत ।
आनंदाने डोलतसे,
स्वामी माझा स्वरूपनाथ ।।१।।
कैसा आलो पावसेत,
भक्ता आश्चर्य निश्चित ।
स्वामी झाला कृपावंत,
आणितसे नकळत ।।२।।
नकळत आलो परि,
कळे खूण लई भारी ।
जपा सोऽहं श्वासावरी,
पोहोचाल पैलतीरी ।।३।।
ऐलतीरी भक्त सारे,
स्वामी असे पैलतीरी ।
पावसची नाव भारी,
कृष्णदास पैलतीरी ।।४।।

***

ऐलथडी पैलथडी,

खेळू खेळ दो घडी ।

वाटाड्या स्वरूपनाथ,

लाभलासे सवंगडी ।।१।।

मार्गामार्गाची ना वेडी,

उरली ती काही कोडी ।

लाभलीसे स्वामीसाथ,

साथ कित्ती भली तगडी ।।२।।

लागता सोऽहं गोडी,

नित्य जडे ती आवडी ।

विषयाची सुटे खोडी,

कार्यकारण तुटे बेडी ।।३।।

पावसची भेट जोडी,

परमार्थाची बैसे घडी ।

भक्त कृष्णदासा नित्य,

स्वामीदर्शनाची ओढी ।।४।।

***

दान काय मागो आम्हीं,

स्वामींचे हो दास ।

स्वामी अमुच्या हृदयी नित्य,

करीतसे वास ।।१।।

स्वामीप्रेमसुख गोडी,

लागली जीवास ।

नाही आता नाही आस,

स्वरूपाचा ध्यास ।।२।।

सोऽहं तंतू उर्ध्व उर्ध्व,

खेचे सावकाश ।

स्वामी श्वास अलगद,

नेई आकाशास ॥३॥

आकाशात विहरे स्वामी,

भक्ता घेई बरोबरी ।

कृष्णदास वर्णी थोरी,

पावसेची तऱ्हा न्यारी ॥४॥

***

२३

स्वरूपनाथ महासिद्ध,
दास आम्ही त्याचे ।
श्रीमंत जणू नृपाचे,
प्रजाजन साचे ।।१।।
अष्टमहासिद्धि,
लोळती चरणी ।
दास मनोरथ सहजी,
पुरवितो धणी ।।२।।
काय मागू त्यासी वाचे,
दास हो फुकाचे ।
कृष्णदास खास त्याचे,
लळे पुरवी साचे ।।३।।

***

स्वरूपनाथ महासिद्ध,
नाथपंथी थोर ।
पावसग्रामी भरे नित्य,
त्याचा दरबार ।।१।।
दर्शनासी आलो,
चरणांवरी शिर ।
स्वामीमूर्ती देखोनिया,
हर्षे भरे उर ।।२।।
शांत निवांत नीरव,
ठाव घेतसे अंतर ।
मन होय निर्विकार,
ऐसा असे दरबार ।।३।।
सोऽहं सोऽहं वारंवार,

श्वास चाले खालीवर ।
त्याचा घेवोनि आधार,
पद पाव निराकार ।।४।।
स्वामी उपदेशी सार,
धरोनिया वर्ते धीर ।
केला आहे अंगिकार,
तुटेल की येरझार ।।५।।
नको होऊ उतावीळ,
सोऽहंनेच लाभे बळ ।
कृष्णदास बाळा कवळ,
माय स्वामी दे तात्काळ ।।६।।

***

अलख अलख गर्जे नाथ,
सोऽहं सोऽहं घ्यावी साथ ।
तोचि असे परम स्वार्थ,
साधा आपुलाले हित ।।१।।
नाथपंथ उपदेशत,
निवृत्तीसी गुह्य कथित ।
ज्ञानोबाने महाराष्ट्रात,
उघडली मुक्ति पेठ ।।२।।
तोचि आला स्वरूपनाथ,
रत्नागिरी पावसेत ।
सोऽहं सोऽहं घोष करीत,

वसतसे अनंतात ।।३।।

माथा ठेविताचि हस्त,

सोऽहं हृदयी प्रकटे खचित ।

पावसी जाता भक्त,

अनुभव होई त्वरित ।।४।।

जा रे जा रे धावा तेथ,

पेठ असे पावसेत ।

कृष्णदास हृदयी ध्यात,

पावसीचा स्वरूपनाथ ।।५।।

***

उठ उठ जागा होई, पावसेची माय पाही ।

पुकारते तुज बाही, पावसेत येई येई ।।१।।

सोऽहं सोऽहं मृदुल कवळ, ये ग बाळा तुज देई ।

गोड गाईल अंगाई, तेणे जाग तुज येई ।।२।।

विषयांचे भय नाही, स्वरूपीच नीज ठायी ।

जन्म ऐसा सफळ होई, आत्मरूप ठाई ठाई ।।३।।

जन्मोजन्मींची पुण्याई, येणे रिती फळा येई ।

धाव धाव कर घाई, खुणाविते स्वरूपाई ।।४।।

कृपाळू प्रेमळाई, लेकुरांसी गूज देई ।

कृष्णदास बाळ गाई, स्वरूपाची नवलाई ।।५।।

***

गुलाबी कांतीचा, स्वामीराज माझा ।
कैवल्याचा राजा, पावसेत ।।१।।

ज्ञानमुद्रा हस्त, असे उभावत ।
भक्तांलागीं देत, आशीर्वच ।।२।।

मंद-स्मित मुख, मोहक वेधक ।
पहावया भूक, नित्य आम्हां ।।३।।

स्वामीसंगे नित्य, क्रीडा करू आम्हीं ।
पावसेच्या धामी, कृष्णदास ।।४।।

***

खुणावतो या रे, स्वामीराज माझा ।
हितार्थ साधाया, जीवनाचा ।।१।।
सोऽहं-गूज गोष्टी, अध्यात्माची सृष्टी ।
पाववितो तुष्टी, भक्तराजा ।।२।।
नको तो विलंब, त्वरित धावा या ।
पावसेची माया, दुर्लभ ती ।।३।।
सुलभ ते आम्हां, झाले भक्तियोगे ।
स्वरूपानंद भोगे, कृष्णदास ।।४।।

***

पावस आमुचे, पराशांति ठाणे ।
ईश्वराचे देणे, भक्तांलागी ।।१।।
शांतीची पै शांति, करीते विश्रांती ।
नाही काही भ्रांती, पावसेत ।।२।।
शरण चरणी, नाही रे विनवणी ।
आपंगितो धनी, तात्काळचि ।।३।।
उघडेल जरी, पुण्याची हो खाणी ।
कृष्णदास वाणी, प्रचितीची ।।४।।

***

स्वरूपाच्या रूपे, आनंद तो नांदे ।

लावील तो छंदे, सर्वकाळ ।।१।।

आनंदाच्या छंदी, भक्तांची हो मांदी ।

पावसेत नांदी, सर्वकाळ ।।२।।

अखंडचि जागा, भक्तहित काजा ।

तो स्वरूपराजा, तिष्ठतसे ।।३।।

नश्वर दुःखाचा, काय तेथ पाड ।

पावस ते गोड, कृष्णदासा ।।४।।

***

## ३१

भ्रमर तो देख, करी गुंजारव ।
मौनाचा अभाव, असे तेथ ।।१।।
तैसे नव्हे देख, स्वरूपाचे सुख ।
मौन वेद देख, काय सांगो ।।२।।
घ्यावया प्रचित, जावे पावसेत ।
स्वरूप सेवित, असे राणा ।।३।।
जाताचि शरणा, दाविल तो खुणा ।
तेथ मौन जाणा, कृष्णदास ।।४।।

***

पावसची भक्ती, देईल हो मुक्ति ।

स्वरूपाची शक्ति, वसे तेथ ।।१।।

अनंती अनंत, शक्ति ती अनंत ।

न लागेचि अंत, कुणालाही ।।२।।

भजता निवांत, स्वरूपाचा प्रांत ।

प्रवेश तो होत, अलगद ।।३।।

स्वामीकृपे तेथ, प्रवेशिता आत ।

सद्गद तो होत, कृष्णदास ।।४।।

***

गुरू स्वरूपानंद, घेई त्याचा छंद ।
सेवू मकरंद, स्व-स्वरूप ।।१।।
आपणां आपण, पाहातसे तेथ ।
वाचा दिठी तेथ, मौनावते ।।२।।
गुरू नाही शिष्य, ईश्वर तो साक्ष ।
अलक्ष्यात लक्ष, लागतसे ।।३।।
दावितसे खूण, हवी त्याची जाण ।
मूक ओळखून, कृष्णदास ।।४।।

***

नाथपंथी हेत, दावावे स्वहित ।
कृपे सुषुम्नेत, प्रवेशवी ।।१।।
मग प्राण चढे, आणिक उतरे ।
संधी कैसा वाढे, अभ्यास तो ।।२।।
कृपेने प्रवेश, कृपे अवकाश ।
दीर्घ होय श्वास, कृपाचि ती ।।३।।
मति गति होय, कृपे निर्विशेष ।
दासाचा तो दास, कृष्णदास ।।४।।

***

नमन अमन, करील ते जाणा ।

पावसचा राणा, मनीं ध्या रे ।।१।।

पाहे शुद्ध भाव, इतर ते वाव ।

कृपेचा वर्षाव, सदा करी ।।२।।

धरोनिया करी, विहरतो वरी ।

सोऽहं करी वारी, भक्तांसवे ।।३।।

पावसची वारी, मुक्ती त्यासी वरी ।

चिदाकाशावरी, कृष्णदास ।।४।।

***

आळंदी ज्ञानाई, तीच स्वरूपाई ।
दावी नवलाई, पावसेत ।।१।।
नाथपंथी दोहीं, सोऽहं सोऽहं गाई ।
नवनीत दोही, जीवदेही ।।२।।
परमहंस ते, पद ते लाभते ।
गूज आकळते, अध्यात्माचे ।।३।।
सोऽहं साधनेची, दाविलीसे थोरी ।
कृष्णदासा वारी, पावसेची ।।४।।

***

सोऽहं सुदर्शन, चक्र नवनाथ ।

साधका रक्षित, सर्वकाळ ।।१।।

विषयांचे भय, मनाचा हो लय ।

स्वरूपाची सोय, दावितसे ।।२।।

ज्ञानोबाने दिले, स्वरूपाते आले ।

पावसी स्थापिले, तेचि पहा ।।३।।

शिरता चक्रात, खेचितो केंद्रात ।

महाशून्याआत, कृष्णदास ।।४।।

***

सोऽहं सोऽहं गूढ, वाटे अवघड ।
बिकट तो चढ, साधकांसी ।।१।।
ऐसें नव्हे काही, कल्पना ती पाही ।
तीच आड येई, प्रगतीच्या ।।२।।
स्वस्थ बैसोनिया, सद्गुरू स्मरावा ।
श्वास निरखावा, कैसा वर्ते ।।३।।
तयाचेचि ध्यान, करता अमन ।
कृपेचि ती खूण, सद्गुरुंच्या ।।४।।
श्वासाचा तो लय, मनाचा विलय ।
ब्रह्मरंध्री जाय, प्राण पाही ।।५।।
ऐसा लागे छंद, नित्य मकरंद ।
चाखितसे मंद, कृष्णदास ।।६।।

***

अंतरीची शांति, ढळेचि ना संती ।

न पडेचि भ्रांति, पावसेत ।।१।।

शांतिब्रह्म तेथ, वसे अनंतात ।

दर्शने हो शांत, मन तुझे ।।२।।

तेथ प्रवेशता, विचारांचा गुंता ।

लोपतो सर्वथा, प्रचित ये ।।३।।

संतदर्शनाची, वर्णितो महति ।

स्वरूपाची शांति, कृष्णदास ।।४।।

***

ज्ञानमुद्रा धरी, ज्ञानदान करी ।

उभावुनि करी, स्वामीराय ।।१।।

नेत्रांचिये द्वारी, स्पर्शितो आधारी ।

खेचितसे वरी, प्राण तो गा ।।२।।

सुषुम्नेची वारी, कृपे सुरू करी ।

नेई सहस्रारी, अविलंबे ।।३।।

घेउनि दर्शना, नमुनि चरणा ।

स्वरूपाच्या स्थाना, कृष्णदास ।।४।।

***

आनंद आनंद, स्वरूपात धुंद ।
आनंदाचा कंद, पावसेत ।।१।।
हर्षे बागडतो, स्वरूप अंगणी ।
स्वरूपाची वाणी, सेवित गा ।।२।।
स्वामींचे बालक, आम्ही खास नेक ।
कृपेची त्या फेक, आम्हांवरी ।।३।।
स्वामी हासे मंद, भक्तांसी आनंद ।
स्वरूपाचा नंद, कृष्णदास ।।४।।

***

स्वामी सोऽहं राजा, भक्तांचिया काजा ।

करीतसे ये जा, ब्रह्मांडात ।।१।।

पावसच्या ठाणी, निर्विकल्प ध्यानी ।

भक्त लक्षी मनी, सर्वकाळ ।।२।।

भक्तांच्या स्मरणी, वायुवेगे धनी ।

त्वरित धावोनि, रक्षितसे ।।३।।

आम्हां चिंतामणी, पावसचा दानी ।

नुरे चिंता मनी, कृष्णदासा ।।४।।

***

संत झाले मुक्त, मुक्त झाले भक्त ।

परि पावसेत, स्वामी वसे ।।१।।

वसे समाधीत, संजीवन त्यात ।

भक्तांच्या हृदयात, स्वामी माझा ।।२।।

करुणासागर, नित्य निरंतर ।

कृपेची पाखर, भक्तांलागी ।।३।।

कृपाछत्र भव्य, अनुभव दिव्य ।

स्वामी सदा सेव्य, कृष्णदासा ।।४।।

***

देह न आम्ही, चैतन्य स्वरूप ।

पावसीचा तात, गर्जतसे ।।१।।

बैसावे निवांत, सोऽहं सोऽहं ध्यात ।

पवनाचा हात, धरोनिया ।।२।।

देह मन सारे, विलय पावे रे ।

आत्मरूप सारे, दर्शन ते ।।३।।

चराचर व्याप्त, चैतन्य सर्वत्र ।

दान ते इच्छित, कृष्णदास ।।४।।

***

आत्मा शुद्ध घन, चैतन्य निर्गुण ।

आपणा आपण,पाहतसे ।।१।।

स्व-स्वरूप खूण, दाविल ती कोण ।

पावस ते स्थान, मनी आणा ।।२।।

स्वरूपाचा राणा, वसे तेथ जाणा ।

मार्गाच्या त्या खुणा, निरोपिल ।।३।।

स्वरूप सदया, स्वार्थ हा साधाया ।

लागतसे पाया, कृष्णदास ।।४।।

***

बाळ माते लक्षी, माता बाळ लक्षी ।

दोहींचे अलक्षी, लक्ष लागे ।।१।।

ऐसा परमार्थ, परम तो स्वार्थ ।

दावाया समर्थ, स्वरूपराज ।।२।।

दावितसे खुणा, संपूर्ण लक्षणा ।

लक्ष ज्याचे उणा, ठकलासे ।।३।।

अहंभाव पिसे, गुरूंसी नकोसे ।

सांगे तुम्हां ऐसें, कृष्णदास ।।४।।

***

निर्मळ जे मन, लक्षी ना जो मान ।
नसे अहं भान, शिष्योत्तम ।।१।।
कुटील मत्सरी, व्यर्थ ताठा करी ।
बरोबरी करी, सद्गुरूंसी ।।२।।
दंभ मनी परी, नम्र दावी वरी ।
सर्वज्ञ तो हरि, काय नेणें ।।३।।
आपणचि श्रेष्ठ, इतर कनिष्ठ ।
त्याची बुद्धि भ्रष्ट, स्पष्ट जाणा ।।४।।
गुरूंसी विनम्र, वर्ते विनयेसी ।
पात्र तो कृपेसी, सद्गुरुंच्या ।।५।।
वाटे सोपे परी, मृत्यू जैसे वरी ।
वर्णी शिष्य थोरी, कृष्णदास ।।६।।

***

पावसचा प्रांत, स्वरूपाचा प्रांत ।
बैसला अनंत, अनंत-निवासी ।।१।।
तोचि स्वामी मनी, आणिक तो ध्यानी ।
एकल्याही क्षणी, विसंबेना ।।२।।
मज नाही स्मृति, आठव तो देती ।
धारियेलें हाती, त्याने मज ।।३।।
काय चिंता भीती, समर्थ तो पाठी ।
पावला निश्चिन्ति, कृष्णदास ।।४।।

***

पावसी पंतोजी, प्रेमळ अति जी ।
छडी न हाती जी, स्वरूपाच्या ।।१।।
मग काय भीती, बालके नाचती ।
खाऊ ती मागती, वारंवार ।।२।।
अभ्यासाच्या कथा, दूर त्या सारता ।
राग नाही नाथा, कदाकाळी ।।३।।
स्वरूप साजिरे, ब्रह्म ते गोजिरे ।
असे ते गोचरे, बालकांसी ।।४।।
ऐसीं स्वरूपाची, शाळा पावसची ।
पूर्वपुण्याईची, कृष्णदासा ।।५।।

***

ज्ञानोबांचे ज्ञान, भावार्थ-दीपिका ।
आंगविले देखा, ऐसा कोण ।।१।।
येरा गबाळ्याचे, नाही आवाक्याचे ।
शब्द-पंडितांचे, खेळणे ते ।।२।।
नाही आंगवणे, व्यर्थ मिरविणे ।
दुज्या प्रवचने, झोडणे ते ।।३।।
निश्चयाचा मेरू, कमालीचा धीरू ।
तोचि तो स्वीकारू, आव्हान हे ।।४।।
एक पावसीचा, रामचंद्र साचा ।
परिपक्वतेचा, याच युगी ।।५।।
इतरांनी मौन, उगी ते धरावे ।
नाथ ते स्मरावे, स्वरूपनाथ ।।६।।
अलौकिक होई, अप्रकट राही ।
पाही नवलाई, कृष्णदास ।।७।।

***

५१

पावसी ईश्वर, स्वरूप साकार ।

नमू वारंवार, तयासी गा ।।१।।

त्याचाचि आधार, साधका अपार ।

कृपे निराकार, पाववितो ।।२।।

बैसोनी आसनी, स्थिर सुखासनी ।

सोऽहं ध्यावा मनी, कैसा काय ।।३।।

विशद करीतो, खूण ती दावितो ।

अलिप्त राहतो, राजीव तो ।।४।।

कृपा आशीर्वाद, भक्तांसी वरद ।

स्मरोन सद्गद, कृष्णदास ।।५।।

***

स्वरूप स्वरूप, सोऽहं स्वरूप ।
पावसी ते रूप, दिसतसे ।।१।।
सोऽहं चा तो ध्वनि, अणुरेणूतुनि ।
गुंजतसे स्थानी, पावसच्या ।।२।।
होता तो संवाद, तोचि अनुनाद ।
प्रत्यय सुखद, हृदयामाजी ।।३।।
स्वामी तो सुखद, चरण सुखद ।
घालीतसे साद, कृष्णदास ।।४।।

***

भक्तीच्या शक्तीनी, निर्गुण सगुणी ।
घ्यावे समजोनी, साधकांनी ।।१।।
आळवी गा हरि, नित्य निरंतरी ।
तो करुणाकरी, पान्हावेल ।।२।।
पाजी कृपास्तन्य, असे जो अनन्य ।
होई धन्य धन्य, भक्तराव ।।३।।
भक्तिभावे स्वामी, आळवितो नामी ।
पावसच्या ग्रामी, कृष्णदास ।।४।।

***

पावसी देखिली, स्वरूपाई मूर्ति ।
गातसो ती कीर्ति, आम्ही बाळे ।।१।।

सोऽहं ची अंगाई, बाळा जरी गाई ।
जाग तेणें येई, नवलाई ।।२।।

करी उपदेश, कोमल शब्दांत ।
मृदू नवनीत, जणू ते गा ।।३।।

स्वामी घेई कष्ट, गूढ करी स्पष्ट ।
बाळ धष्टपुष्ट, कृष्णदास ।।४।।

***

सहज सोपारे, मार्ग अध्यात्माचा ।
आड वळणाचा, नाही मुळी ।।१।।
वेढ्यात निजली, जागृत ती केली ।
सहस्त्रारी नेली, उर्ध्व पंथे ।।२।।
आधी होता शून्य, अंती झाला शून्य ।
शून्या उणे शून्य, शून्यचि गा ।।३।।
स्वरूपाने पावसी, किमया दाविली ।
ती अनुभविली, कृष्णदासे ।।४।।

***

पावस पंढरी, विठ्ठल तो स्वामी ।

ज्ञानमुद्रा नामी, हस्त करी ।।१।।

क्षेत्र पावसेत, बैसे तेथ हरि ।

उभावुनि करी, कृपा दान ।।२।।

भक्तिभाव वीट, कृपा करी थेट ।

निवारी संकट, भक्तांचे गा ।।३।।

साधके स्मरता, घालता साकडे ।

अध्यात्माचे कोडे, उकलील ।।४।।

जोडे स्वात्मसुख, पाहता श्रीमुख ।

कृष्णदासा सुख, पावसेत ।।५।।

***

सांगतो मी गोष्ट, कां गा घ्यावे कष्ट ।

श्रीहरीच स्पष्ट, पावसेत ।।१।।

होता तो गा तुष्ट, पावाल संतुष्ट ।

आत्मराज स्पष्ट, हृदयांतरी ।।२।।

भक्तिभाव श्रेष्ठ, तेणे स्वामी तुष्ट ।

नको तुम्हा कष्ट, साधनेचे ।।३।।

क्षेत्र पावसेत, जाण्या घ्यावे कष्ट ।

जाहला संतुष्ट, कृष्णदास ।।४।।

***

हृदयाचा ठाव, घेती सुनयन ।
भक्तांसी ते ध्यान, श्रीमुख गा ।।१।।

सुहास्य वदन, प्रेमळ वचन ।
आपुलकी पूर्ण, स्वागत ते ।।२।।

मायपित्याहुनि, कैसा तो लळा ।
स्वामी हा आगळा, पावसीचा ।।३।।

कृपेचा सगळा, सोहळा आगळा ।
अश्रू घळाघळा, कृष्णदासा ।।४।।

***

वीटे विठूराणा, मौन स्वतः जाणा ।

नाही खाणाखुणा, निश्चल तो ।।१।।

पावसेचा राणा, तैसा नव्हे जाणा ।

दावोनिया खुणा, मौनावितो ।।२।।

उपदेशामृत, पाजुनि सत्वर ।

आसनासी स्थिर, करितसे ।।३।।

सोऽहं अनिवार, प्राण वर वर ।

विठू जैसा स्थिर, करितो गा ।।४।।

कृष्णदास पहा, करितो हाकाटी ।

घ्यावी थेट भेटी, पावसेची ।।५।।

***

संजीवन आत, वसे समाधीत ।
पावसी वसत, योगिराणा ।।१।।
भोगितो स्वानंद, स्वरूप आनंद ।
लावेल तो छंद, तुम्हांसी गा ।।२।।
पावन तो संग, भवभय भंग ।
आनंद तरंग, साधकांसी ।।३।।
पावसीचा नंद, पावसी हो दंग ।
गातसे अभंग, कृष्णदास ।।४।।

***

जोडोनिया कर, नमू गुरूवर ।

पावूया सत्वर, आशीर्वच ।।१।।

तोचि दानी एक, दावी मार्ग नेक ।

न जावे आणिक, पंथा लागे ।।२।।

नाथपंथी नंद, हे स्वरूपानंद ।

स्वरूप स्वानंद, अर्पितील ।।३।।

पावसीच्या घरा, जा हो जा सत्वरा ।

मार्ग मिळे खरा, उद्धाराचा ।।४।।

ज्ञानोबांचा ध्वज, लहरतो आज ।

प्रचित सहज, कृष्णदासा ।।५।।

***

स्वरूप-सावली, शीतल आम्हांसी ।

जाताचि पावसी, लाभतसे ।।१।।

संसाराने श्रांत, जाहले संत्रस्त ।

विसावा त्वरित, भक्तांलागीं ।।२।।

जैसे कन्येलागी, माहेराचे सुख ।

पाहता श्रीमुख, जोडतसे ।।३।।

पावसची माया, पावसची छाया ।

पापताप विलया, पावतसे ।।४।।

पावस माहेर, सत्य हे उद्‍गार ।

जाय वारंवार, कृष्णदास ।।५।।

***

सद्‌गुरू तरंग, सद्‌गुरूंचा संग ।
भक्त त्यात दंग, सर्वकाळ ।।१।।

सद्‌गुरू स्वरूप, आवडे अमाप ।
पाहता गा ताप, शमतसे ।।२।।

सद्‌गुरू चिंतन, बोधाचे मनन ।
अमृताचे पान, साधकांसी ।।३।।

सद्‌गुरू सुस्थान, विश्रांतीचे ठाण ।
सांगतो ही खूण, कृष्णदास ।।४।।

***

सद्गुरूंचे दान, लाभतो तो धन्य ।
सद्गुरू महान, दाता तो गा ।।१।।
धन्य ते जीवन, अध्यात्माची जाण ।
अध्यात्माचे ज्ञान, जया होय ।।२।।
गुरूपायी लीन, जो का नम्र दीन ।
लाभे त्या सुदिन, यथाकाळी ।।३।।
अहंपणा बळी, देवोनि तात्काळी ।
ब्रह्मानंदी टाळी, लावावी गा ।।४।।
गुरुकृपा सत्य, आहे सर्वकाळी ।
द्यावी की हो टाळी, कृष्णदासा ।।५।।

***

करू गुज गोष्टी, ऐसा कोण सृष्टी ।
पाववील तुष्टी, गुरूराज ।।१।।
मनीचे जनीचे, भार ते फुकाचे ।
ओझे सहजीचे, उतरेल ।।२।।
माया जरी सारी, तापचि हो भारी ।
एक तो निवारी, सद्‌गुरूचि ।।३।।
सद्‌गुरू चरणी, करी विनवणी ।
सुटे भवातुनी, कृष्णदास ।।४।।

***

सोऽहं तंतुकार, विणतो गे शेले ।
पावसी जे गेले, लाभले त्यां ।।१।।
मऊ मृदुल गे, अति सुखदायी ।
पाही लवलाही, पांघरवी ।।२।।
भेट ती मायेची, सोडवेना साची ।
भेट स्वरूपाची, अमूल्यचि ।।३।।
पाखर कृपेची, देई स्वरूपाई ।
जपतसे हृदयी, कृष्णदास ।।४।।

***

आता कोठें मन माझे, धावे रे गोपाळा ।।धृ.।।

सद्‌गुरूने भाळी, लाविला जो टिळा

करुणा करोनिया, आपंगिले बाळा

आता कोठें मन माझे, धावे रे गोपाळा ।।१।।

प्रेमळ कृपाहस्त, थापटी तो भाळा

कुशीमध्ये घेवोनिया, सांभाळीतो बाळा

आता कोठें मन माझे, धावे रे गोपाळा ।।२।।

अडखळ धडपड, दया त्या दयाळा

चटदिशी पटदिशी, सावरीतो बाळा

आता कोठें मन माझे, धावे रे गोपाळा ।।३।।

स्मरणेचि उभा, सामोरी तात्काळा

कृष्णदास नयनी अश्रू, वाहे घळाघळा

आता कोठें मन त्याचे, धावे रे दयाळा

आता कोठें मन त्याचे, धावे रे गोपाळा ।।४।।

***

अनुभूति येता उघडे नित्य,
प्रसन्नतेची खाण ।
परमशांति नित दिव्य अखंडित,
सिद्धांचे भूषण ।।१।।
कृतज्ञतेने नित्य मनी ते,
सद्‌गुरूंचे स्मरण ।
निज क्षुद्रत्व ओळखुनिया,
नितांत राही शरण ।।२।।
मर्यादेसी लंघी न कदा,
जैसी पायी वहाण ।
ज्ञाना तुका, शिष्यवराची,

सांगे निश्चित खूण ।।३।।

पहा पहा हो साधक जनहो,

स्वतःसीच ताडून ।

हस्त-कांकणा आरसा कशा,

अंतरातचि ये जाण ।।४।।

सांप्रत ऐसा दुर्लभचि तो,

कलियुग हे कारण ।

कृष्णदास उत्सुक दर्शना,

अन् स्पर्शाया चरण ।।५।।

***

निळ्या नभात दिसतो स्वामी,
जनावनातही तोचि दिसे ॥१॥
तन मन व्यापुनि टाकीतसे,
अन् नेत्रांतही तोचि वसे ॥२॥
अहं जाळुनी सोऽहं पिसे,
भक्तांलागी लावितसे ॥३॥
पावसीचा नाथ स्वरूप हा,
कृष्णदास नित ध्यात असे ॥४॥

***

मज वेध लागले पावसीचे,

मज वेध लागले पावसीचे ।।धृ.।।

मम स्वामींच्या भेटीचे,

दर्शन घ्याया स्वामींचे ।।१।।

कल्लोळ पावन स्मृतींचे,

भाव उमलविती ह्रदयाचे ।।२।।

स्वरूपनाथ नाथ आमुचे,

भक्तगण आम्ही साचे ।।३।।

कृष्णदास मनोमनी नाचे,

येई भरते प्रेमाचे ।।४।।

मज वेड लागले पावसीचे,

मज वेड लागले पावसीचे ।।धृ.।।

***

पहावे आपणा आपण, अध्यात्माचा उद्देश जाण ।
कशास शास्त्रांचे चर्वण , निश्चये मांड ठाण ।।१।।
अहं विसर जाण, सोऽहं मनी आण ।
नको दुजा कोण, हेचि वैराग्य लक्षण ।।२।।
स्वये लक्षी खूण, करी स्व-निरीक्षण ।
अनुसंधान क्षणोक्षण, वृद्धि शांति समाधान ।३।।
होता सद्गुरू कृपा पूर्ण, घडे स्व-रूप दर्शन ।
हृदयी सद्गुरू चरण, कृष्णदासे मांडिले ठाण ।।४।।

***

उसळितो स्वानंद, हृदयी फुलतो आनंद ।।धृ.।।

उमलला स्वरूप कंद, करितसे अहा धुंद ।।१।।

वाचे वदा श्रीगोविंद, वा लुटा मौनानंद ।।२।।

हो श्वास मंद मंद, विरे काल मापदंड ।।३।।

कृपा गुरूंची प्रचंड, आनंदासी नाही खंड ।।४।।

होऊनिया गुरूनंद, कृष्णदास घेई छंद ।।५।।

***

शांत शांत प्रशांत रे, जाणिवेचा प्रांत रे ।
नाही नाही भ्रांत रे, जाहलो निवांत रे ।।१।।
श्रांतले शांत रे, विचारांचा अंत रे ।
भाग्य हे उदित रे, भेटले संत रे ।।२।।
पावसी अनंत रे, भेटला श्रीकांत रे ।
करवीरी दत्त रे, माथा कृपाहस्त रे ।।३।।
गुरुकृपा वसंत रे, अहाहा! फुलत रे ।
कृष्णदास शांत रे, गातसे हे गीत रे ।।४।।

***

अभेद-भजन, देई समाधान ।
स्वामी संजीवन, गाथे सांगे ।।१।।
भेद कैसा कोण, कैसे ते भेदन ।
एकरूप कोण, कोणासी ते ।।२।।
वृत्ति उद्‌गमन, तेचि व्यवधान ।
जे उगमस्थान, तेथ जावे ।।३।।
निर्गुणाचे स्थान, एकरूप खूण ।
पावसेची जाण, कृष्णदासा ।।४।।

***

सोड हा विचार, सोड तो विचार ।

नित्य निर्विचार ,राहे उगा ।।१।।

सोडिता विचार, प्रचित अंतर ।

तेथ निरंतर, जडे नां कां ।।२।।

सोडिता व्यापार, साक्षित्व साचार ।

तेचि निराकार ,स्थान की गा ।।३।।

तेथ एकाकार, साधना प्रकार ।

सद्‌गुरू आधार, कृष्णदासा ।।४।।

***

निर्गुण निर्गुण, कैसी ओळखण ।
हाचि एक प्रश्न, साधकांसी ।।१।।
व्हावे विस्मरण, आपुलाले गुण ।
उरेल ती जाण, निर्गुणाची ।।२।।
विस्ताराची खूण, मनोदय जाण ।
निमता ते मन, निर्गुण रे ।।३।।
स्वसंवेद्य भान, गुरुकृपा खूण ।
निर्गुणात लीन, कृष्णदास ।।४।।

***

भक्त आणि भक्ति, बोलबाला किती ।

खूण आकळीती, ऐसे किती ।।१।।

द्वैताची ती भक्ति, सत्य काय गा ती ।

की एकरूप स्थिती, अद्वय ती ।।२।।

सुखरुप स्थिति, सुखमय स्थिति ।

घ्यावा भेद चित्ती, सूक्ष्म गा हा ।।३।।

स्वामी पावसेती, भेद गा कथिती ।

संजीवनीच ती, कृष्णदासा ।।४।।

***

सोऽहं सोऽहं पावसेसी,

लक्षिसी ना कां ध्वनीसी ।।१।।

तोचि गर्जे अंतरासी,

भान त्याचे कां न घेसी ।।२।।

तोचि साक्षी जगतासी,

तोचि तो तू स्वये होसी ।।३।।

स्वरूप-स्वामी उपदेशी,

धरी कां ना पवनासी ।।४।।

उलटवोनि पवनासी,

कृष्णदास मनी हासी ।।५।।

***

बोल मौनावले, ध्यान मौनावले ।

मन मौनावले, पावसेत ।।१।।

तन विसावले, मन विसावले ।

नेत्र विसावले, पावसेत ।।२।।

थकले भागले, स्वामींपासी आले ।

निवांत जाहले, क्षणार्धात ।।३।।

भरुनिया आले, नेत्र झाले ओले ।

लक्षितो पाऊले, कृष्णदास ।।४।।

***

चला जाऊ पावसेला, चला जाऊ पावसेला ।
चला चला उत्सवाला, चला जाऊ पावसेला ।।१।।
स्वरूपनाथ बैसलेला, अनंत-निवासाला ।
जाऊ चला दर्शनाला, नमू पदकमलाला ।।२।।
घेऊ सेवू प्रसादाला, गोड गोड शर्करेला ।
स्वामी देई वर चला, चला पावू आशिषाला ।।३।।
चला नाचू गाऊ चला, आनंदाचा उत्सव आला ।
सोऽहं ध्वज फडकला, कृष्णदास मनी धाला ।।४।।

***

चला चला लवलाही,

करू पावसेची घाई ॥१॥

वाट पाहे स्वरूप-आई,

तिज पहा करमत नाही ॥२॥

विरहाची सीमा होई,

त्वरा करा धावत जाई ॥३॥

चरणी ठेवोनिया डोई,

होऊ पालखीचे भोई ॥४॥

ॐ राम कृष्ण हरि,

भक्तगण हर्षे गाई ॥५॥

गाऊ नाचू डोलू देही,

आनंदासी उधाण येई ।।६।।

रोमांचित तनू होई,

देहभान हारपत जाई ।।७।।

भक्त-भावाची पुण्याई,

स्वामी दिसे ठाई ठाई ।।८।।

उत्सवाच्या पावन वेळी,

ब्रह्मानंदी लागे टाळी ।।९।।

साधुनिया मंगल वेळी,

कृष्णदास देई टाळी ।।१०।।

***

पावस पंढरी, आम्ही वारकरी ।
सोऽहं एकतारी, असे आम्हां करी ।।१।।
छेडितसे तार, स्वामी हृद्यंतरी ।
करी गुंजारवी, नित्यचि अंतरी ।।२।।
अनंताच्या द्वारी, भाव तो झंकारी ।
देखता श्रीहरि, सफळ हो वारी ।।३।।
देहभान त्वरी, गेले दिगंतरी ।
भक्त कृष्णदास, स्तब्ध विठूपरी ।।४।।

***

८३

आला आला हो द्वारी, भक्त,
आला हो द्वारी ।।
गात गर्जत मुखे, राम कृष्ण हरि ।
गात गर्जत मुखे, राम कृष्ण हरि ।
आला आला हो द्वारी,
भक्त ,आला हो द्वारी ।।धृ.।।
टाळ पताका संगे, वीणा खांद्यावरी ।
तन मन सारे धुंद, धुंद अभ्यंतरी ।
आला आला हो द्वारी, भक्त आला हो द्वारी ।।१।।
उत्सवाचा दिन आज, हर्ष अंतरी ।
पहा पहा दिसे हास्य, श्रीमुखावरी ।

आला आला हो द्वारी, भक्त आला हो द्वारी ।।२।।

उधळीतो भाव गुलाल, गेला अंबरी ।

कृष्णदास भक्त, स्वरूपा, कवतुक भारी ।

आला आला हो द्वारी, भक्त आला हो द्वारी ।।३।।

***

स्वामी आत्मरंगी, रंगुनिया ठेले ।
पावसी जे गेले, रंगले ते ।।१।।

होता स्वामीसंग, भव झाला भंग ।
शांति ती अभंग, सहजचि ।।२।।

मनाचा या संग, पावलासे भंग ।
स्थिति ती अभंग, निर्विचार ।।३।।

साधनेचे सार, क्षणेचि अपार ।
तो किमयागार, पावसेत ।।४।।

नाथ स्वरूप हा, पावसी जा पहा ।
दर्शनी अहाहा! कृष्णदास ।।५।।

***

संग पावसचा, छंद पावसचा ।
रंग पावसचा, आम्हां सदा ।।१।।
स्वामी रूप ध्यान, स्वामी गुणगान ।
स्वामींचे चिंतन, सर्वकाळ ।।२।।
स्वामी उपदेश, अमोलिक खास ।
तोचि तो अभ्यास, आम्हीं करु ।।३।।
पावसीचा गुरू, तोषता सत्वरु ।
देईल गा वरु, तुम्हांसी गा ।।४।।
पावसीच्या संगे, आत्मरंगी रंगे ।
कृष्णदास सांगे, लाभ जोडा ।।५।।

***

नको ती वैखरी, सांगू गोष्ट खरी ।
संतसंग करी, सर्वकाळ ॥१॥
संतांची ती स्थिति, लाभते आयती ।
चालवा ना मति, मौन धरी ॥२॥
संतापाशी जावे, चरण नमावे ।
उगी ते पहावे, चमत्कार ॥३॥
देहात दिसती, निराकार स्थिति ।
परेसी स्पर्शिती, तात्काळचि ॥४॥
गाभ्यासि स्पर्शणे, जागृतीचे देणे ।
पराशांति लेणे, लेववितो ॥५॥
सांगितली खूण, घ्यावी हो जाणून ।
कृष्णदासा जाण, गुरुकृपे ॥६॥

***

कष्ट साधनेचे, कशासी फुकाचे ।
क्षेत्र पावसचे, गाठावे गा ।।१।।
चंचल मनाचे, बडिवार साचे ।
स्थिरावण्या वेचे, नच काही ।।२।।
स्वरूपा सामोरी, बैसा बाकावरी ।
लक्ष ते अंतरी, सहजीच ।।३।।
तन आणि मन, दोन्ही निवांतणं ।
पावसचं देणं, सांगू काय ।।४।।
स्वरूप दर्शनी, स्वरूपाची खूणी ।
सार्थकता मनी, कृष्णदासा ।।५।।

***

सोऽहं प्रभावित, क्षेत्र पावसेत ।

अणूरेणू घोष, सोऽहं सोऽहं ।।१।।

जावे अनंतात, बैसावे निवांत ।

स्वामी तिथे गात, सोऽहं सोऽहं ।।२।।

ऐकता संगीत, विचारांचा अंत ।

रमती निवांत, भक्तगण ।।३।।

ऐकताचि सोऽहं, विस्मृत हो अहम् ।

अनुभव सोऽहं, कृष्णदासा ।।४।।

***

बैसतो पावसी, नित्यचि मानसी ।

स्वरूप स्वामींसी, ध्यातो आम्हीं ।।१।।

स्वामी पलंगासी, पाहता भक्तासी ।

मुखकमलासी, हास्य भरे ।।२।।

मनोरथ पुरे, मनपण विरे ।

स्वरूपाचे वारे, स्पर्शिताचि ।।३।।

सारोनिया सारे, पावस स्मरा रे ।

सांगतो ऐका रे, कृष्णदास ।।४।।

***

नाचत नाचत जाऊयाऽऽ, पावसीऽऽ पावसीऽऽ

पहा पहा हर्ष कितीऽऽ, मानसीऽऽ मानसीऽऽ

पोहोचलोऽऽ पोहोचलोऽऽ, अनंतऽऽ निवासीऽऽ

देखिलेऽऽ देखिलेऽऽ, पावसीच्याऽऽ राजासीऽऽ

बैसलाऽऽ बैसलाऽऽ, पद्मासनी खोलीसीऽऽ

रमलाऽऽ रमलाऽऽ जो, सोऽहं सोऽहं ध्यानासी

भुकेलाऽऽ भुकेलाऽऽ,भक्तिभाव प्रेमासीऽऽ

लक्षितोऽऽ लक्षितोऽऽ जो, स्मरताऽऽे तयासीऽऽ

तोषलाऽऽ तोषलाऽऽ,पाहुनिया भक्तासीऽऽ

आनंदऽऽ आनंदऽऽ, दर्शनीऽऽ भक्तासीऽऽ

शर्कराऽऽ वचनऽऽ, आशिषऽऽ तयासीऽऽ

आनंदाचा उत्सव, नित्यचिऽऽ पावसीऽऽ

कृष्णदास धन्य धन्य, कृतार्थऽऽ मानसीऽऽ

***

पावसी अंगणी, बैसू स्वामीसंगे ।
स्वरूपाच्या रंगे, रंगोनिया ।।१।।
अंगणी झोपाळा, स्वामी वेळोवेळा ।
झुलवितो बाळा, अळुमाळू ।।२।।
स्वरूप-समीर, मंद हळुवार ।
शीतल अपार, सुखदायी ।।३।।
स्वरूपाच्या छंदी, आली पहा धुंदी ।
बाळ हा आनंदी, कृष्णदास ।।४।।

***

स्वामी कुरवाळी, बाळा लडिवाळी ।
थापटितो भाळी, मृदू-हस्ते ।।१।।
बाळ अवखळ, खेळी नाना खेळ ।
माया ती सकळ, विस्तारली ।।२।।
पडे धडपडे, बाळ हासे रडे ।
कौतुक केव्हढे, स्वामीराया ।।३।।
जपे जीवापाड, मायेचा बिमोड ।
बाळा नाही चाड, काळाचीही ।।४।।
निजला खुशीत, बाळ तो कुशीत ।
स्वामीही निवांत, कृष्णदास ।।५।।

***

नको ज्ञान, नको मुक्ति,

स्वामींची करू भक्ति ।।१।।

नको युक्ति नको शक्ति,

स्वामींची करू भक्ति ।।२।।

नको आस, नको प्राप्ति

स्वामींची करू भक्ति ।।३।।

निरास त्या सर्वप्राप्ति

स्वामींची असे शक्ति ।।४।।

कृष्णदास सांगतसे,

जाणुनिया घ्यावी युक्ति ।।५।।

***

आहे आहे नामी, स्वरूपाचा स्वामी ।

पावस या ग्रामी, राहतसे ।।१।।

स्वरूपाचा ध्यास, लावितसे खास ।

विषयांचा फास, सैलावतो ।।२।।

सोऽहं सोऽहं ऐसा, अभ्यास हा खासा ।

ज्ञानोबा वारसा, चालवितो ।।३।।

आळंदीची पेठ, पावसेत थेट ।

चालतसे वाट, कृष्णदास ।।४।।

***

आत्मा सर्वांतरी, सर्वव्यापी परी ।
खूण कैशापरी, आकळेल ।।१।।
ज्ञानदेवे जरी, वर्णिली ती खरी ।
लोटला त्यावरी, बहुकाल ।।२।।
शाश्वत ती नित्य, आहे आहे सत्य ।
दावाया तों प्रत्य, प्रकटला ।।३।।
पावसी स्वरूप, ज्ञानेशाचे रूप ।
आनंद अमूप, कृष्णदासा ।।४।।

***

ज्ञानोबाने गीता, दोहुनि अमृता ।
शांतविले चित्ता, बहु जन ॥१॥

वेदोपनिषदे, मतितार्थ वदे ।
अभ्यासिता साधे, परमार्थ ॥२॥

साधनेचे गुह्य, साधकांसी साह्य ।
बदल सबाह्य, अमृते या ॥३॥

भाषा कालबाह्य, करावया साह्य ।
सुलभ ते गेय, रूपांतर ॥४॥

हो हो वेषांतर, करोनि श्रीधर ।
घेई अवतार, स्वरूप गा ॥५॥

ज्ञानोबा स्वरूप, दोहीं एकरूप ।
प्रचिती अमूप, कृष्णदासा ॥६॥

***

ज्ञानेशाची माया, जना उद्धराया ।

अखंडित कार्या, उतावीळ ।।१।।

दीपिका तेवत, असे आळंदीत ।

नित्य प्रज्वलित, ज्ञानदीप ।।२।।

लावलीसे ज्योत, आली पावसेत ।

दोहीं प्रकाशात, भेद नाही ।।३।।

जो का ज्ञाननाथ, तो स्वरूपनाथ ।

केलेसे सनाथ, कृष्णदासा ।।४।।

***

ज्ञानदेवे गूज, लेववुनि साज ।
दिधलें सहज, जनांलागीं ।।१।।
तये अभ्यासत, जीव असंख्यात ।
मुक्त ते निश्चित, जाहले गा ।।२।।
स्वयें ते स्वरूप, जाणे आपोआप ।
येई ज्ञानरूप, अनुभव ।।३।।
ऐसीं ईशकृपा, चुकवील खेपा ।
मार्ग करीं सोपा, परमार्थ ।।४।।
अभंगात सार्थ, आणिले समस्त ।
तो स्वरूपनाथ, पावसेत ।।५।।
जेवी असे वंद्य, ज्ञाननाथ आद्य ।
स्वरूप सदय, कृष्णदासा ।।६।।

***

११

मन पावसेत, पावस मनात ।
स्वामी अंतरात, व्यापुनिया ।।१।।

स्वामी नयनांत, ‘नयन’ लक्षित ।
नाही विसंबत, क्षणमात्र ।।२।।

स्वामी-नाम जप, स्वामी-बोध तप ।
ध्यान स्वामी-रूप, भक्तांलागीं ।।३।।

ऐसा पहा स्वामी, भेटतसे नामी ।
पावसच्या ग्रामी, कृष्णदासा ।।४।।

***

स्वामींचे स्मरण, भाव आंदोलन ।

खूण हृदयस्थान, भक्ताचे ते ।।१।।

देतसे स्मरण, भक्ता स्वतःहून ।

कैसे विस्मरण, घडेल गा ।।२।।

होता विस्मरण, भाव आंदोलन ।

स्वामी हृदयस्थान, तेथे होय ।।३।।

ऐसें आंदोलन, चाले क्षणोक्षण ।

जाणे त्याची खूण, कृष्णदास ।।४।।

***

प्रेमाची उबळ, भक्तासी केवळ! ।
अरेरे निर्फळ, भक्ति ऐसी!! ।।१।।
भक्तीचे ते बळ, स्वामींसी उबळ ।
भेटी तळमळ, भक्ताचिये ।।२।।
ऐसी सिद्ध भक्ति, तीच असे शक्ति ।
स्वामींची ती प्राप्ति, तयासीच ।।३।।
निरास जो चित्ती, जगाची विस्मृति ।
एकनिष्ठ रिती, स्वामी भजे ।।४।।
ऐसाचि भजावा, स्वामी मिळवावा ।
कृष्णदास दावा, करीतसे ।।५।।

***

वंद्य आम्हां गुरुराज, पावसी ।
वंद्य आम्हां गुरुराज, पावसी ।
आनंद आम्हांसी नित्य, मानसी ।
आनंद आम्हांसी नित्य, पावसी ।।
स्वामी लक्षितो, बाळ हितासी ।
बाळ क्रीडतो, निश्चिंतेसी ।
बाळ क्रीडतो, आनंदेसी ।।
स्वामी दाविती, निज लीलेसी ।
पाहुनि बाळा, हर्ष मानसी ।।
बाळ नमिता, स्वामी पदांसी ।
स्वामी आशिष, दे बाळासी ।।
सेवन करूनि, स्वरूप खाऊसी ।
कृष्णदास हा, तृप्त मानसी ।।

***

१०३

स्वरूपानंद स्वरूपानंद, गाऊ ध्याऊ करू आनंद ।।

चला चालू पदी मंद, मनी ध्याऊ स्वरूपानंद ।।

भेटू नमू स्वरूपानंद, देईल तो स्वरूपानंद ।।

तुटेल हा भवबंध, नासेल विषयकंद ।।

आनंद हो आनंद, होऊ भक्त आम्ही धुंद ।।

मनी ध्यात स्वरूपानंद, चालतसे वाट मंद ।।

कृष्णदास स्वरूप-नंद, लक्षितसे स्वरूपानंद ।।

***

शास्त्र ते कीचाट, दुर्बोध अचाट ।
गुंतती फुकट, परमार्थी ॥१॥
पारायणे घाट, करिती ते पाठ ।
प्रवचन थाट, मांडिती गा ॥२॥
मुखे फटाफट, दृष्टांत उद्धृत ।
समाधान त्यात, तयांलागीं ॥३॥
परि ते विकट, अहं करी पुष्ट ।
देव तयां स्पष्ट, नाकारितो ॥४॥
श्रवण वाचन, कुणा समाधान ।
गोडी गुळावीण, कैसी कळे ॥५॥
घ्यावी संतभेट, वगळोनी क्लिष्ट ।
करिती ते स्पष्ट, उपदेश ॥६॥
धरोनिया हात, खूण ते दावित ।

नेती अंतरात, सहजचि ।।७।।
क्रमिली जी वाट, दाखविती थेट ।
आचरिता पाठ, मुक्काम गा ।।८।।
पावस मुक्कामी, करिता मुक्कामी ।
स्वामी तो मुक्कामी, नेतसे गा ।।९।।
साधा संधी नामी, जा पावसग्रामी
स्वामी तेथ नामी, बैसलासे ।।१०।।
जाऊनिया तेथ, असे जो नमित ।
कार्य हो खचित, तयाचें गा ।।११।।
बोल ना फुकट, घ्यावी हो प्रचित ।
कृष्णदास स्पष्ट, सांगतसे ।।१२।।
***

श्रीगुरु महति, ज्ञानोबा कथिती ।
करिती विनती, पदोपदी ॥१॥
तया नमस्कार, करी वारंवार ।
तेचि असे सार, साधनेचे ॥२॥
व्यर्थ अहंकार, नको बडिवार ।
शरण साचार, जावे गा ॥३॥
ही शरणागति, गुरुकिल्लीच ती ।
खूण बांधा चित्ती, उद्धाराची ॥४॥
श्रीगुरू महाराज, पावसीचा मज ।
असे चरणरज, कृष्णदास ॥५॥

***

सुखदायी सार रे, सुखदायी फार रे ।
कृपादृष्टी सार रे, गुरूदेवांची ।।१।।

गुरूदेव तारू रे, सकलाधारू रे ।
ती कृपाधारू रे, अपरंपारू ।।२।।

तेणे घेतलासे रे, सारा तंव भार रे ।
आता तरी वावर रे, निर्भय गा ।।३।।

सोड 'तव' सारे रे, होई 'एकरूप' रे ।
आनंदाचे वारे रे, सुसाट गा ।।४।।

आनंदी आनंद रे, स्वरूपानंद रे ।
बाळ पुरवि लळे रे, कृष्णदास ।।५।।

***

संतसंग होता, घडे आत्मस्पर्श ।
न लागे सायास, काही एक ।।१।।
दृष्टीक्षेप एक, कृपेचि हो फेक ।
अनायासे देख, भेट होता ।।२।।
पाप वा पुण्याची, गणना नाहीचि ।
कृपा ती संतांची, निरपेक्ष ।।३।।
स्वरूपाचा स्वामी, स्वरूपी विश्रामी ।
स्वरूपाच्या धामी, कृष्णदास ।।४।।

***

संतांचा संकल्प, ना व्यर्थ कदाप ।
सामर्थ्य अमाप, कैसे वर्णू ।।१।।
नसेचि सामान्य, ईश्वरासी मान्य ।
भक्ता करी धन्य, यथाकाळी ।।२।।
परि एक मेख, मायेची हो फेक ।
सुटे कोणी एक, भाग्यवान ।।३।।
ऐसेचि मागणे, जेणे धन्य होणे ।
ऐसें जे जाणणे, निज-रूप ।।४।।
स्व-रूप ओळख, मागणे हे नेक ।
स्वरूपाची फेक, कृष्णदासा ।।५।।

***

शांति आनंदाची, मूर्ति पावसेची ।
नाथ स्वरूपाची, ध्यानी मनी ॥१॥
शांति आनंदाचे, धाम पावसचे ।
स्थान माहेरचे, भक्तांलागीं ॥२॥
संसार सासरी, स्वामी तो माहेरी ।
स्मरण अंतरी, सर्वकाळ ॥३॥
सर्वकाळ संग, शांतीचे तरंग ।
आनंद अभंग, कृष्णदासा ॥४॥

***

संसार सागरी, आधार श्रीहरि ।

तो पावसपुरी, स्वरूपनाथ ।।१।।

हस्त तो भक्कम, आधार कायम ।

गाऊ त्याचे नाम, निरंतर ।।२।।

नाम निरंतर, ध्यान निरंतर ।

सौख्य निरंतर, स्वरूपाचे ।।३।।

ऐसा असे नामी, स्वरूपाचा स्वामी ।

पावसी विश्रामी, कृष्णदास ।।४।।

***

स्वामी दयाघन, स्वानंदाचे दान ।

द्यावया बैसोन, पावसेत ।।१।।

लक्षावे चरण, तेचि रात्रंदिन ।

विलय ते मन, पावेल गा ।।२।।

मनाचा विलय, आनंदा उदय ।

स्थिति गा निर्भय, पावसील ।।३।।

स्वरूपासी लक्षी, स्वरूप पावसी ।

म्हूण सांगे खासी, कृष्णदास ।।४।।

***

पराशांति स्थान, पावस हे जाण ।
घेई गा तू जाण, मनामाजी ।।१।।
पावसेत मन, करी गा तल्लीन ।
लाभशील खूण, तयाचि तू ।।२।।
जाशील निवांती, शांति शांति शांति ।
स्वरूपी विश्रांति, पावसील ।।३।।
पावसच्या रंगी, स्वरूप तरंगी ।
विहरे निःसंगी, कृष्णदास ।।४।।

***

चित्त सुनिर्मळ, कृपेचेचि फळ ।
साधनेसी बळ, अपार दे ।।१।।
निर्मळ चित्तात, स्वरूप प्रकट ।
जैसे दर्पणात, प्रतिबिंब ।।२।।
चित्तची चैतन्य, नव्हेंचि गा अन्य ।
शास्त्रकारा मान्य, सिद्धांत हा ।।३।।
निर्मळ चिंतन, गुरू आलंबन ।
स्वरूपाचे ध्यान, करी ना कां ।।४।।
स्वरूपी अहम्, विरमे सोहम् ।
मिटतो कोहम्, अनायासे ।।५।।
स्वरूपाचे पिसे, लागता हो ऐसें ।
ध्यानी घेई खासे, कृष्णदास ।।६।।
***

११४

आनंदाची खाणी, पावसच्या स्थानी ।
मांडुनि तो ठाणी, स्वरूपानंद ।।१।।
स्वरूप स्वानंद, चाखीत गा मंद ।
अनंतात धुंद, स्वामीराय ।।२।।
परिस स्पर्शिता, परिसचि होय ।
अट्टाहास काय, लागतसे ।।३।।
स्वरूप सानिध्य, लाभता सहज ।
अन्य काय काज, उरे तेथें ।।४।।
स्वरूपाची धुंदी, करिते आनंदी ।
विहरे स्वच्छंदी, कृष्णदास ।।५।।

***

१ १ ५

नाही देखिला हो, आम्ही तो श्रीहरि ।

स्वामीच श्रीहरि, आम्हांलागी ।।१।।

सोहं सोहं पावा, पावस या गावा ।

भुलवितो जीवा, अनन्य जो ।।२।।

जीवभाव हरि, हरी तो लाघवी ।

किमया तो दावी, भक्तांलागीं ।।३।।

अनंतात बैसे, लावितसे पिसे ।

ध्यान ते आपैसे, कृष्णदासा ।।४।।

***

१ १ ६

नमो स्वामीराया, स्वरूप सदया ।

जननीची माया, मूर्तिमंत ।।१।।

लेकराचे हित, नित्य तू लक्षित ।

तेणे गा निश्चिन्त, भक्तबाळे ।।२।।

सर्वशक्तिमान, सर्वज्ञ महान ।

कृपाळू ना आन, तुजविण ।।३।।

स्वरूप चरणी, करी विनवणी ।

आलासे शरणी, कृष्णदास ।।४।।

***

स्वरूपाची भक्ति, करू या सारे ।
स्वरूपाची शक्ति, पावू या सारे ।
स्वरूपाची शांति, लाभू गा सारे ।
स्वरूपी विश्रांति, लाभू गा सारे ।
पावसीचा नाथ, नित्य तो स्मरा रे ।
अनंत अनंतातील, नित्य आळवा रे ।
सार्थक जन्माचे, करोनिया घ्या रे ।
पावसी आनंदात, रमू या सारे ।
यारे यारे सारे, भक्तजन यारे ।
भक्त कृष्णदास, पाचारितो या रे ।।

***

अखंड उल्हास, देई साधकास ।
बळ साधनेस, निरंतर ।।१।।
अनुभवावीण, साधना हो क्षीण ।
मन होई खिन्न, क्षणोक्षणी ।।२।।
सद्गुरू स्मरावे, तत्क्षणीच भावे ।
मना गोंजारावे, हळुवार ।।३।।
तेणे ये उभारी, विश्वास अंतरी ।
साधना भरारी, घेतसे गा ।।४।।
मार्ग दीर्घ जरी, चाला येणे परी ।
नेई पैलतीरी, गुरुराज ।।५।।
साधनेचे गुज, ध्यानी घ्यावे आज ।
सांगतो सहज, कृष्णदास ।।६।।

***

## ११९

रंगू द्या गा मज, स्वरूपाच्या रंगे ।

संसाराच्या संगे, त्रासले गा ।।१।।

पूर्वसुकृताने, गुरू हे भेटले ।

मन निवांतले, कृपेने गे ।।२।।

स्वरूपाची खूण, दिली दाखवून ।

अभ्यासी त्या मग्न, राहू द्या की ।।३।।

कृतार्थ जीवन, करूया साधून ।

कृष्णदास मन, इच्छितसे ।।४।।

***

१२०

किती दूरवर, स्वरूपाचे घर ।
अंतरी ती तार, जोडलेली ।।१।।

सोहं टणत्कार, अखंड झंकार ।
घुमवी अंतर, स्वामीराय ।।२।।

होईल गा पहा, कैसा तो विसर ।
छेडितसे तार, स्वये स्वामी ।।३।।

भाग्य हे लाधले, स्वामी हे भेटले ।
निश्चिन्त जाहले, कृष्णदास ।।४।।

***

रम्य ते पावस, स्वरूपाचा वास ।
करिता निवास, मन रमे ।१।।
मृदुल तरंग, स्पर्शिती रे अंग ।
सुखद तो संग, भक्तांलागीं ।।२।।
स्वामी कुठे रे, तेथेचि आहे रे ।
प्रचित घ्यावी रे, भक्तिभावे ।।३।।
भक्तीचिये स्वरे, आळविता बरे ।
तोषतो सत्वरे, स्वामीराय ।।४।।
स्वरूपाच्या संगे, स्वरूप तरंगे ।
मत्त भक्तिरंगे, कृष्णदास ।।५।।

***

१२२

वृत्ति नित्य शांत, तोचि असे संत ।
करील निवांत, तुजलागी ।।१।।
साधक मनात, वृत्ति त्या अनंत ।
चैन नाही देत, क्षणभरी ।।२।।
संतांच्या संगती, साऱ्या त्या निवती ।
सत्संग महति, ऐसी असे ।।३।।
संत एक ऐसें, पावसी निवसे ।
नित्य स्मरतसे, कृष्णदास ।।४।।

***

।। ॐ तत् सत् ।।

http://www.krishnasaraswati.com

जुलै २०२०